| | |
|---|---|
| **MHKO110018902025** | नियमित दिवाणी दावा क्र. २१८/२०२५ मधील<br>निशाणी क्रमांक २४ खालील आदेश<br>सदाशिव रामचंद्र भोसले<br>विरुध्द<br>सुभाष पांडुरंग पाटील वगैरे |

प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज हा महत्वाची कागदपत्रे दाखल करण्यासाठी केलेला आहे. सदर अर्जावर वादीने तीव्र आक्षेप नोंदविलेला आहे.

२. प्रतिवादींचे असे कथन आहे की, सदर कामी काही महत्वाची कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदरील कागदपत्रे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असल्याने न्यायालयाच्या कामी हजर करून घेणे महत्वाचे असलेने प्रतिवादींनी सदर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे सदर कागदपत्रे कायदेशीर तरतुदीप्रमाणे दाखल नाहीत. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

३. प्रतिवादी तर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. वादीने सदर दावा हा कायम मनाई करिता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणात नि. ५ वर युक्तिवाद झाला असून नि. ५ च्या आदेशाकरिता प्रलंबित आहे. सदर प्रकरणात मुद्दे काढलेले नाहीत. प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार केला असता सदरील कागदपत्रे दाखल करुन घेतल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी यांना सदर कागदपत्रांवर उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. म्हणून सदर अर्ज नामंजूर करणे संयुक्तीक वाटत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# आदेश

१. अर्ज अशंत:मंजूर करण्यात येतो.

२. सदर कामी कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

sd/-

दिनांकः- ०४/११/२०२५
पेठवडगाव

( आर. एस. मोरे )
३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पेठवडगाव